भारतीय निवडणुकांत सीआयए-मोसादची भूमिका

कुमार केतकर

शब्दांकन

कलीम अजीम

भारताची राज्यघटना समिती १९४६ साली स्थापन झाली. तोपर्यंत फाळणी झालेली नव्हती. त्या संदर्भात फक्त दोन मिटिंगा झालेल्या होत्या. त्यानंतर १९४७ला स्वातंत्र्य आणि फाळणी दोन्ही झालं. त्यामुळे त्या समितीला आपली रचना बदलावी लागली. १९४६ साली राज्यघटना तयार झाली असती तर ती अखंड भारताची ठरली असती. पण फाळणी झाल्यामुळे भारत व पाकिस्तानची वेगवेगळी राज्यघटना स्वाभाविकतःच होणार होती. अशा परिस्थितीत ब्रिटिश बाहेर पडले. वर्षभरात महात्मा गांधींची (१९४८) हत्या झाली. गांधी स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचं प्रेरणास्थान होते. राज्यघटनेत स्वातंत्र्य चळवळीतील मूल्यं शक्यतो व्यक्त व्हावी, असं गांधीजींना अभिप्रेत होतं. त्यामुळे राज्यघटनेवर त्यांचा एक प्रकारचा वैचारिक दबाव होता. १९४८ला गांधी वारले आणि पाठोपाठ सप्टेंबरमध्ये फाळणीचे कर्ते बॅ. जीनाही वारले.

दोन महत्त्वाच्या घटनांनी १९४९ साल उजाडलं. एक, चीनमध्ये राज्यक्रांती झाली आणि त्यांनी तिथं लोकशाही आणली. त्यांचं घोषणापत्र पीपल्स डेमॉक्रसी असं होतं. दुसरं, त्याच वर्षी सोव्हिएत रशियाने अणू चाचणी केली. तोपर्यंत फक्त १९४५च्या (हिरोशिमा-नागासाकी) अमेरिकेच्या ॲटम बॉम्बची चर्चा होती. म्हणजे फक्त अमेरिकेकडेच अण्वस्त्रे होती. बाकी कुठेही नव्हती. त्यामुळे अमेरिकेतील सत्ताधारी वर्गाने रशिया आणि चीनलाही धमक्या देण्यास सुरुवात केली की, आमच्याकडे अण्वस्त्रे आहेत. परिणामी १९४५ला दुसरे महायुद्ध संपल्यानंतरही जगभर तणावाचं वातावरण होतं. १९४९ साली जोसेफ स्टॅलिनच्या नेतृत्वाखाली रशियात झालेल्या अणू चाचणीने या वातावरणाला एकदम तडा गेला.

आता सोव्हिएत रशिया व अमेरिका अशा दोन अणू संपन्न शक्ती तयार झाल्या होत्या. या घटनांमधून पूर्वी असलेला असंतोष अजून तीव्र झाला. त्याला शीतयुद्ध असं म्हटलं गेलं. १९४९ सालापर्यंत भारताची राज्यघटना अजून कार्यान्वित झालेली नव्हती. १९५० साली भारताने राज्यघटना स्वीकारली. शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर ही राज्यघटना अस्तित्त्वात आली होती. राज्यघटना निर्मितीनंतर दोन वर्षांनी १९५२ साली पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. तोपर्यंत म्हणजे १९४७ ते १९५२ पाच वर्ष हंगामी सरकार होतं. त्यात हिंदू महासभेचे श्यामाप्रसाद मुखर्जी होते. तसंच डॉ. बाबासाहेब आंबेडकरही होते. हे निवडून आलेलं सरकार नव्हतं.

लेखक ठाणेस्थित ज्येष्ठ पत्रकार, संपादक व राज्यसभेचे माजी सदस्य आहेत. शब्दांकनकार पुणेस्थित मुक्त पत्रकार आहेत.

ketkarkumar@hotmail.com

kalimazim2@gmail.com

पहिल्या निवडणुकीनंतर जगातील अमेरिका, युरोप सगळीकडील वर्तमानपत्रांनी असं म्हटलं होतं की, भारताच्या स्वातंत्र्याचं काही खरं नाही. स्वातंत्र्य पूर्ण कार्यान्वित व्हायच्या आतच फाळणी झालेली आहे. हे पहिलं विभाजन आहे. अजून चिकार फाळण्या होतील. हा देश काही एकत्र राहणार नाही. 'बाल्कनायझेशन ऑफ इंडिया' हा शब्दप्रयोग सर्व युरोपीयन भाष्यकार व अमेरिकेतील एकूण वृत्तपत्रे, बड्या-बड्या विचारवंतांनी वापरला.

पूर्वी युगोस्लाव्हिया देशात सात-आठ राज्य बाल्कन स्टेट होती. ती १९२०नंतर युगोस्लाव्हिया म्हणून एकत्र झाली. जोसिप टीटोंनी त्यांना सामर्थ्य दिलं. त्यातून युगोस्लाव्हिया नावाचा देश उभा राहिला. त्याला स्टेटस मिळालं. त्याला पॉवर मिळाली. पुढे त्याला युनायटेड नेशन्समध्ये स्थान लाभलं. त्यामुळे टिटोंच्या भूमिकेला जगभरात महत्त्व प्राप्त झालं. त्याचकाळी अलिप्त राष्ट्र (नॉन अलाईटमेंट) चळवळीची स्थापना झाली. त्यात जोसिप टिटो, इजिप्तचे जमाल नासर आणि जवाहरलाल नेहरू यांचा पुढाकार होता. तर अशा बाल्कन स्टेटमधून युगोस्लाव्हिया निर्माण झाला होता. पण बरोबर त्याच्या उलट भारतात घडेल, भारत बाल्कनाईज होईल आणि त्यातून अनेक राष्ट्रे निर्माण होतील. पाकिस्तान झालंच आहे, अजून होतील, अशी भाकीते तिकडे करण्यात आली. हे आव्हान पंडित नेहरूंच्या समोर होतं. त्यामुळे भारतातील अनेक नेत्यांवर दवाब होता की, भारताला बाल्कनाईज होऊ द्यायचं नसेल तर आपलं केंद्र सबळ असलं पाहिजे. त्यातून केंद्रीयदृष्ट्या सार्वभौम होण्याची संकल्पना अधिक जोरात पुढे आली. यात कोणाचा कट नव्हता, तर ते परिस्थितीचं गणित होतं.

वास्तविक, भारताचं बाल्कनायझेशन व्हावं, अशी ब्रिटिशांचीही इच्छा होती, हे आपण लक्षात घेत नाही. कारण त्याची फारशी चर्चा होत नाही. ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र्य द्यायची इच्छा नव्हती. पण जर स्वातंत्र्य अमलात आणायचा प्रसंग आलाच, तर त्यांनी वेगळी योजना ठरवली होती. ब्रिटनमध्ये १९४५च्या महायुद्धापासून १९४७पर्यंत भारताच्या स्वातंत्र्याविरोधात मोठा प्रवाह होता. ही मंडळी वर्तमानपत्रांत उघडपणे लिहीत की, आपण भारत जिंकलेला नाही. इंग्रज सैन्य घेऊन आले आणि त्यांनी भारत जिंकला व राणीचं राज्य प्रस्थापित केलं, असं झालेलं नाही. इथं ५६५पेक्षा जास्त संस्थाने होती. आपण सर्व संस्थाने बरखास्त केली. आपण त्या-त्या संस्थानिकांना त्यांची सत्ता सुपुर्द करू या. म्हणजे मग भारताचा कुठे प्रश्न आला? १८७४मध्ये त्या-त्या संस्थानाकडून आपल्याकडे सत्ता आली आणि आपण त्याला भारत घोषित केलं. त्याचा व्हिक्टोरिया राणीने अधिकृतपणे ब्रिटिश इंडिया प्रस्थापित केला. त्यामुळे भारताला नव्हे तर त्या-त्या संस्थानांना तो परत करूया, ही चर्चा होती.

या पार्श्वभूमीवर संस्थाने व राजे-रजवाड्यांमध्ये फुटीर विचार पसरला होता. त्यावेळी त्रावणकोर-कोचीन, काश्मीर, हैदराबाद, जुनागड या संस्थानांनी सांगितलं होतं की, आम्ही भारतात येणार नाही. गोव्यानेही भारतात सामील होणं स्पष्टपणे नाकारलं होतं. अशा पद्धतीने भारतीय उपखंड दुभंगलेला होता. त्यावेळी भारतीय उपखंडाचा बराचसा भाग ब्रिटिश इंडियाचा हिस्सा होता. अगदी एडनपासून ते श्रीलंका, म्यानमार, नेपाळपर्यंत. त्यामुळे आपले जुने सिनेमे किंवा कादंबऱ्यांमध्ये रंगून व सिलोनचं चित्रण मूळ भारतात दाखवलेलं दिसतं. शरदचंद्र चटर्जींच्या कादंबरींची पात्र रंगूनला जातात. सुभाषबाबू व टिळकांना मंडालेला (ब्रह्मदेश) अटकेत ठेवलं होतं. ब्रह्मदेश हा एकच ब्रिटिश इंडियाचा भाग होता. या पार्श्वभूमीवर ब्रिटिश इंडियाची चर्चा सुरू झाली होती. आता तर फाळणी केलेली आहे. जे काही शिल्लक आहे त्याला बाल्कनाईज करायचा असा ब्रिटिशांचा डाव होता. पुढे यासंबंधी अधिकृत प्रयत्न सुरू झाले. त्यात सीआयए होती. १९६८मध्ये याचा प्रत्यक्ष उल्लेख अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट विल्यम रॉजर्स यांनी केला होता. त्यांनी

असं म्हणून दाखवलं की, आपल्याला बाल्कनाईज करता येईल. त्याची पद्धत त्यांनी सांगितली होती.

१९६७च्या निवडणुकीत भारतात एकसंध असलेली काँग्रेसची सत्ता खिळखिळी झाली. एकूण ८ राज्यांमध्ये काँग्रेसचा पराभव झाला. ठिकठिकाणी प्रादेशिक पक्ष सत्तेत आले. पहिल्यांदा १९६७ला तामिळनाडूत द्रमुक सत्तेवर आला. पश्चिम बंगालमध्ये सीपीएम व स्थानिक बंगाल काँग्रेस एकत्र आली. पुढच्या काळात कम्युनिस्ट पार्टी ऑफ बंगाल एक प्रकारे बंगालचा स्वतंत्र पक्ष असल्यासारखी झाली. अशा स्थितीत इथं घुसखोरी म्हणजे डावपेचाचं राजकारण करून भारताच्या अनेक फाळण्या करता येतील, असं वातावरण तयार झालं.

लगेच तसं होतं असं नाही. परंतु तसा प्रयत्न सुरू झाल्यामुळे आपलं सेंटर स्ट्राँग असलं पाहिजे म्हणजे फुटीर प्रवृत्तींना आटोक्यात ठेवता येईल, असा विचार पुढे आला. त्यातून केंद्र अधिकाधिक सार्वभौम होऊन गेलं. त्या पार्श्वभूमीवर १९६९च्या सुमारास पंतप्रधान इंदिरा गांधींनी त्यांचे सचिव पी. एन. हक्सर यांच्या सल्ल्यानुसार पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) स्ट्राँग करायला सुरुवात केली. त्यानंतर एक स्वतंत्र मजबूत पीएमओ आणि सार्वभौम केंद्र याची प्रक्रिया सुरू झालेली दिसते. परिणामी सीआयएने आपला डाव सोडला असं नाही, तो अधिक वेगळ्या पद्धतीने अमलात आणला. पुढे ते अनेक पद्धतीने दिसून आले.

उदाहरणार्थ, २०१४ची निवडणूक. त्याची आकडेवारी एकदम साधी आहे. ती सहज लक्षात येते. २००९मध्ये काँग्रेसला भाजपच्या विरोधात २०६ जागा होत्या. पाच वर्षांआधी २००४मध्ये काँग्रेसला १४५ जागा मिळाल्या होत्या. पुढच्या पाच वर्षांत हा आकडा २०६पर्यंत गेला. हाच प्रवाह पुढे राहिला असता तर २०१४ला किमान २५० जागा मिळू शकल्या असत्या. इतर मित्रपक्षांच्या सहकार्याने काँग्रेस जवळजवळ बहुमतापर्यंत पोहोचलं असतं. म्हणजेच २०१४ला काँग्रेस पुन्हा मोठ्या प्रमाणात सत्तेत आली असती. हे चित्र २००९ला २०६ जागा आल्या त्यावेळी दिसायला लागलं होतं. तेव्हापासून खेळ सुरू झाला की, कोणत्याही परिस्थितीत २०१४मध्ये काँग्रेसच्या जागा वाढता कामा नये.

२०१४मध्ये २०६च्या एकदम ४४! म्हणजे १४५, २०६ आणि एकदम ४४; कोणाचा विश्वास बसेल? माझा तर तेव्हाही नव्हता आणि आताही नाही. हा ४४चा आकडा केवळ जनमताने आलेला नव्हता. त्यावेळी मनमोहनसिंग सरकारविषयी नाराजी व असंतोष तयार झाला होता. पण तो २०६वरून थेट ४४पर्यंत जाईल, इतकी नाराजी नव्हती. अल्पमतात आल्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षाचं स्थान सुद्धा मिळालं नाही. काँग्रेसला २०६वरून खाली उतरवल्याशिवाय आपल्याला इथं नीट डावपेच करता येणार नाहीत, हे समजून वागणाऱ्या ज्या संस्था होत्या, त्यात एक 'सीआयए' होती. त्याच्याबरोबर दुसरी संस्था इस्रायलची 'मोसाद' होती. या दोघांनी मिळून असं ठरवलं की, भारतात काहीतरी करायला पाहिजे. नसता आपल्याला हस्तक्षेप करायला जागा उरणार नाही. काँग्रेससारखं किंवा काँग्रेसच्या व्यतिरिक्त काँग्रेसी आघाडीचं एक स्थिर सरकार भारतात तयार झालं, तर 'मिलिटरी इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स' सरकार आणण्याचं आपलं धोरण राबवता येणार नाही. आपल्याला अनुकूल असं सरकार तिथं आलं तर भारत आपल्या ताब्यात राहील. म्हणजे आपल्याला मेजॉरिटी पाहिजे पण ती काँग्रेसप्रणित सरकारची नको. कारण काँग्रेसप्रणित सरकारने आतापर्यंतची देशाची संचरना उभी केली आहे. त्याला ते संरक्षित करतील. त्यामुळे आपल्याला मान्यता देणारं सरकार मग ते मेजॉरिटी असो किंवा कोणी असो – ते ठेवलं तरी हरकत नाही. या पद्धतीने त्यांनी सुरुवात केली आणि त्यासाठी 'मोसाद'ने संपूर्ण एक स्ट्रक्चर तयार केलं. त्यामुळे मोसादला कमी लेखता कामा नये. याचा अर्थ अवाजवीदेखील ठरवता कामा नये. या संस्थांनी सूक्ष्म पद्धतीने डेटा तयार केला. भारतातील

सर्व राज्ये, एकूण मतदारसंघाचे तपशिल जमा केले. भारताचा आतापर्यंतचा जास्तीत जास्त डेटा सीआयए आणि मोसादकडे आहे.

याचं एक छोटे उदाहरण पाहू. ते सर्वांच्या परिचयाचं आहे. आठवत असेल तर २०१६-२०१७ला भारतात पेगॅससच्या हेरगिरीचा प्रश्न उपस्थित झाला. पेगॅसस ही इस्रायलची स्पायवेअर कंपनी आहे. ती मोबाईल फोनचा एकूण डेटा संकलित करते. ऑक्टोबर, २०२४मध्ये एक बातमी आली होती की, इस्रायलने पेजरमार्फत लेबनॉनमध्ये बॉम्ब हल्ला केला. त्या घटनेत १४ ठिकाणी माणसं मेली. तब्बल १४ ठिकाणी त्यांनी पेजर कंट्रोल करून बॉम्ब उडवले होते. त्यानंतर दुसरी बाब तुमच्या लक्षात आली असेल तर २०२२ला कित्येक ठिकाणी वृत्तपत्रात बातम्या होत्या की, महाराष्ट्रात पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यावर त्या सर्वांचे फोन अवैधरित्या टॅप करतात, हा आरोप झाला होता. हे फोन टॅप करण्याचं तंत्र पूर्वीपासून आहे. अगदी इंग्रजांच्या काळात सुद्धा होतं. पण त्यावेळी लँडलाईन होते, आता मोबाईल आले. जवळजवळ प्रत्येक माणसाच्या हातात, प्रत्येक विरोधी पक्षाच्या माणसाकडे, सिव्हिल सोसायटी, एनजीओ सर्वांकडे फोन आहेत. ह्या फोन्सवर कंट्रोल करता आला पाहिजे, असं त्यांना वाटते. मोबाईलचा जसा आपल्यासाठी फायदा (ॲडव्हांटेज) आहे, तसाच तो त्यांच्यासाठी गैरफायदाही आहे. म्हणून त्यांनी पेगॅससमार्फत आपले सगळे फोन नंबर्स, ईमेल्स, काही प्रमाणात आपले व्हॉट्सॲप सुद्धा, (व्हॉट्सएपला इन्क्रिप्शन करून वेगळं केलं असलं तरी) सर्व कम्युनिकेशन सिस्टीम आपल्या कंट्रोलमध्ये असल्या पाहिजेत, त्या मॉनिटर करता आल्या पाहिजेत आणि त्या रिडायरेक्ट करता आल्या पाहिजेत याच्यासाठी पेगॅसस नावाचं टेक्नॉलॉजिकल यंत्र वापरलं गेलं. हा स्पायवेअर पेगॅसस कंपनी चालवते. कंपनीचे मालक अनेक असतात, त्याच्या मालकांमध्ये मुख्यत: इस्रायलचा पंतप्रधान नेत्यानाहू आहे.

२०१७मध्ये पेगॅससवर पार्लमेंटमध्ये चर्चा झाली. पेगॅससचा इस्रायली सरकारशी थेटच संबंध आहे. भाजप सरकार व नरेंद्र मोदींचा त्यात सहभाग आढळला. नरेंद्र मोदींची निकटवर्तीय गँग पेगॅससमध्ये लोकांचे फोन मॉनिटर करण्यात सहभागी आहे. त्यावेळी रविशंकर प्रसाद माहिती आणि प्रसारण मंत्री होते. ही केस कोर्टात गेली. पण अद्याप कोर्टात उभी राहिली नाही, पेंडिंग आहे. त्यावर अनेक संशोधकांनी रिसर्च पेपर सादर केले. त्यांनी असंख्य पुरावे समोर आणले की, पेगॅसस आणि मोदी सरकार यांचं किती जवळचं नातं आहे आणि कसं कुंभाड ते रचू शकतात, याचे सर्व पुरावे सादर केलेले आहेत.

जगभर निरनिराळ्या वर्तमानपत्रांमध्ये विशेष लेख छापून आले की, पेगॅसस कसं कंट्रोल केलं जातं. पेगॅसस ही इस्रायलची एजन्सी फक्त भारतावर कंट्रोल करत नाही तर जगभर कंट्रोल करायचा प्रयत्न करते. विशेषत: अमेरिका! अमेरिकेत एक विचारप्रवाह आहे, जो म्हणतो की, इस्रायल अमेरिकेला कंट्रोल करण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे.

या सहसंबंधाचा अजून एक अलीकडचा संदर्भ लक्षात घेता येईल. तो म्हणजे 'हमास'ची स्थापना! पॅलेस्टिनी मुक्ती नेते यासर अराफात यांना आव्हान देण्यासाठी हमासची स्थापना करण्यात आली होती. त्याच्या स्थापनेत अमेरिका, इस्रायल होती. तालिबानसारखचं हमासला निर्माण करण्यात आलं. पूर्वी तालिबान नव्हतं. लहानपणी, शाळेमध्ये, पुढे कॉलेजमध्ये, नंतर नोकरी करताना १९९०पर्यंत तालिबान हा शब्दच कोणी ऐकलेला नव्हता. कारण त्यांची स्थापना १९७९-८९च्या काळात झाली. अमेरिका आणि काही प्रमाणात पाकिस्तानच्या मदतीने ती अस्तित्त्वात आणली गेली. पण कशासाठी?

अफगाणिस्तानमध्ये सोव्हिएत युनियनच्या फौजा होत्या. त्यांना पराभूत करण्यासाठी स्थानिक इस्लामिक मूलतत्त्ववादी संघटनांना सांगण्यात आलं की, हे सर्व

(रशियन्स) ईश्वरविरोधी लोक आहेत, त्यांचा पूर्ण पराभव केल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येणार नाही. म्हणून अशा ईश्वरविरोधी फौजांचा पराभव करण्यासाठी मूलतत्त्ववाद्यांची संघटना उभी केली गेली. त्या मूलतत्त्ववादी आणि दहशतवाद्यांना सर्व प्रकारची शस्त्रास्त्र, आर्थिक व राजकीय रसद अमेरिका व पाकिस्तानने पुरवली. अशा रीतीने तालिबान जन्माला आलं. त्याच काळात म्हणजे १९७९ ते १९८९मध्ये इराक-इराण युद्ध चालू होतं. त्या युद्धाच्या नंतर आणि त्याच्या सुमाराला आपल्या हाती एखादी एजन्सी असावी म्हणून त्यांनी तालिबान तयार केली. त्याला दुसरा एक टोक होतं. १९७९मध्ये इराणमध्ये इस्लामिक क्रांती झाली. शाह रेजा पहेलवी यांचं शासन जाऊन रुहल्लाह खोमेनी यांचं राज्य आलं होतं.

खोमेनीच्या शासनकाळात तेथील लोकांना सांगितलं गेलं की, आमचा मुख्य शत्रू अमेरिका आहे. 'हेट्स टू अमेरिका' अशी त्यांची घोषणा होती. अमेरिका तेव्हा पॅनिक झाली होती. कारण तिने जगातील सगळीकडचं युद्ध हरलं होतं. त्याच्या आधी पाच वर्षात ते व्हिएतनामचं युद्ध हरलं होतं. मग त्याने कंबोडियात सुद्धा काही उपद्रव करून पाहिला. पण अमेरिकेला कुठे सत्ता हाताशी दिसत नव्हती. ती परत मिळवण्यासाठी अमेरिकेने अनेक प्रयत्न केले. त्यात त्यांच्या लक्षात आलं की, सोव्हिएत युनियनला हरवायला ह्याच इस्लामिक मूलतत्त्ववादाचा वापर करता येईल, ज्या मूलतत्त्ववादाने आपल्यावर चाल केली. अशा पद्धतीने अमेरिकीकरणातून इस्लामिक मूलतत्त्ववादाची वाढ झालेली आहे.

पुढे याच मूलतत्त्ववाद्यांनी २००१मध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला केला. त्या काळात मी वर्तमान पत्रात नोकरी करत होतो. सर्वांना आठवत असेल की, पाकिस्तान किंवा अन्य कुठूनतरी जवळजवळ दररोज बातम्या यायच्या - अमेरिकेतील कोणत्यातरी पत्रकार, पर्यटक, लेखकाला दहशतवादी आणि इस्लामिक मिलिटंटने किडनॅप केलं. मग हळूहळू त्यांची हत्या केल्याच्या बातम्या पसरत. कधी-कधी त्यांचे भयानक फोटो येत. त्यात तो पत्रकार, लेखक खाली गुडघे टेकून बसलेला आहे आणि दहशतवादी किंवा मुखवटे घातलेले लोक कुऱ्हाड वगैरे घेऊन त्याला मारायला येत आहेत. मग एकाएकी तो प्रकार थांबला. कुठे गेल्या त्या बातम्या? सगळं बंद झालं. त्या काळात तसा प्रकार वाढवणे त्यांची गरज होती. १९९१ला सोव्हिएत युनियनचं विघटन झाल्यानंतर त्यांना कळत नव्हतं की, आता करायचं काय? त्यातून इस्लामिक मूलतत्त्ववादाला सुरू करण्यात आलं होतं.

सोव्हिएतच्या विघटनासाठी अमेरिकेने प्रचंड मिलिटरी इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स (एमआयसी) वापरला होता. अमेरिकेची जवळजवळ ३५ टक्के इकॉनॉमी एमआयसीवर अवलंबून आहे. त्याला इस्रायलची मदत होती. इस्रायल आणि अमेरिका मिळून एमआयसी हा व्यवसाय संबंध जगभरात चालवितात. जगाला शस्त्रास्त्रे पुरवितात. या व्यवसायात फ्रान्स व इंग्लंडचाही मोठा वाटा आहे. असे सर्व एमआयसीज वापरून सोव्हिएत युनियनला संपवलं. त्यासह शीत युद्ध संपुष्टात आलं. मग त्यांना प्रश्न पडला की, आता कोणाच्या विरुद्ध शस्त्रास्त्रे निर्माण करायची? सोव्हिएत युनियन तर गेला, आपण त्याच्याविरुद्ध एवढं केलं, शस्त्रास्त्रं वाढवली, अँटीबॅलेस्टिक मिसाईल असं सगळं करून झालं, आता पुढे काय करायचं?

१९९१ला सोव्हिएत युनियन संपलं आणि १९९३मध्ये सॅम्युएल हंटिंग्टनने एक प्रबंध लिहिला. त्याचं नाव होतं 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन.' त्यात त्याने असं म्हटलं की, आता इथून पुढचं जगातील युद्ध इस्लाम विरुद्ध इतर अशी असतील. एका बाजूला इस्लामिक आणि दुसऱ्या बाजूला ख्रिश्चन, हिंदू आणि ज्यू इत्यादी. तोपर्यंत त्यांच्यासाठी सोव्हिएत युनियन व कम्युनिझम हा एकच शत्रू होता, आता इस्लाम शत्रू झाला.

प्रकाशन दिनांक : १६ फेब्रुवारी २०२६

साधारणत: १९९० ते १९९५पर्यंत इस्लामिक मूलतत्त्ववाद फारसा माहीत नव्हता. भारतात शीख मूलतत्त्ववादाचं नाव ऐकू यायचं. देशात त्याची चर्चा होती. ती १९८४ सालापासून सुरू होती. पण तत्पूर्वी तथाकथित इस्लामिक दहशतवादाचा मुद्दा कोणी काढलेला नव्हता. तो १९९३ साली पहिल्यांदा सुरू झाला. कारण त्यावेळी (२६ फेब्रुवारी १९९३) वॉल स्ट्रीटवर (२००१चा नव्हे) दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. तेव्हापासून अमेरिकेने इस्लामिक मूलतत्त्ववाद, हाच कसा जगाला धोका आहे, हे सांगायला सुरुवात केली. भारतामध्ये इस्लामचा विरोध बरोबर त्याचवेळी सुरू झालेला आहे. कुठलाही घटनाक्रम सहज घडत नसतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात खून होतात, ते योगायोग नसतात. ज्या वर्षी वॉल स्ट्रीटला बॉम्ब हल्ला झाला, त्याच्या पुढच्या आठवड्यात १२ मार्च रोजी मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाले. त्यानंतर हळूहळू इस्लामचा धोका आहे, असं पसरवलं गेलं. हे सर्व करण्यात सीआयए, मोसाद यांसारख्या इंटरनॅशनल एजन्सीचा वाटा आहे. कुठल्याही घटनेत परकीय हात असल्याचं पुढे आणलं की, भारतातील लोकांना टिंगल करायची सवय आहे. त्यामुळे अशा हस्तक्षेपाकडे तेवढं गांभीर्याने पाहिलं गेलं नाही. अशा रीतीने आपणही हळूहळू त्या 'अँटी इस्लाम पॉलिटिकल सेंटिमेंट'ला पूर्णत: बळी पडलो.

आज संपूर्ण जगभर इस्लामोफोबिया आहे. आपल्याकडे मुसलमान म्हटलं की, नाक मुरडण्याची सवय आहे. हे फक्त भाजपमध्ये नाही. काँग्रेसमधील अनेक लोकांच्या मनात अँटी इस्लाम भूमिका असते. बहुसंख्याक वर्गाप्रमाणे ती काँग्रेसमध्ये सुद्धा असते. ती अँटी इस्लाम भूमिका त्यांना फायद्यात पडते, तशा पद्धतीनेच त्यांनी ती वाढवलेली आहे. त्यामुळे बाबरी मस्जिद उद्‌ध्वस्त केल्यानंतर काँग्रेसवाल्यांना बऱ्यापैकी आनंद झालेला होता. काश्मिरसंबंधी ३७० कलम काढल्यानंतर बहुसंख्य काँग्रेसींना हर्षवायू झाला होता. संसदेत हे मी माझ्या डोळ्याने पाहिलं आहे. कारण त्यांच्या डोक्यात ३७० नव्हतं, बाबरी मस्जिद नव्हती, तर त्यांच्या डोक्यात इस्लामविरोध भिनलेला होता.

२५ नोव्हेंबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अयोध्येत भगवा ध्वज फडकविला. त्याला सर्वांनी भरघोस पाठिंबा दिला. वृत्तपत्राच्या फ्रंट पेजला बातम्या आल्या. ते रामाचं कौतुक नव्हतं. हिंदुत्वाचं तर अजिबात नाही. ते अँटी इस्लाम राजकारणाचं कौतुक आहे. त्याच्या दुष्प्रचाराचा तो एक भाग आहे.

त्यामुळे आत्ता आपण ज्या स्थितीत आहोत, त्याला, आपल्या देशाला मुख्य धोका झायोनिस्ट इम्पिरिॲलिझमचा – इस्रायलच्या साम्राज्यवादाचा आहे. त्यामुळेच एका इस्रायलच्या लेखकाने काश्मीरची तुलना करताना भाजपला उपदेश दिला होता की, आम्ही जसं पॅलेस्टाइन हँडल करतो, तसं तुम्ही काश्मीर हँडल करायला पाहिजे. त्यावेळचा आरएसएसच्या लोकांचा प्रचार पाहिला तर त्याची सत्यता कळून येते. इस्रायलच्या गाझावरील हल्ल्याच्या वेळी भाजप-संघाच्या लोकांचा व्हॉट्सॲपवरील प्रचार फार विकृत होता. त्यात ते म्हणत होते, पॅलेस्टाइनमध्ये ज्यू जसा नरसंहार करत आहेत, तेच आपण काश्मीरमध्ये केलं पाहिजे, बरं झालं ते मुसलमानांना मारत आहेत. जी भाषा आपल्याकडे काश्मीर संबंधात येते, अगदी तीच भाषा त्यांच्याकडे पॅलेस्टाईन संबंधात येते.

पॅलेस्टाईन संदर्भात भारताची भूमिका शंकास्पद आहे. संयुक्त राष्ट्र संघात जगातील १६९ पैकी १५० देशांनी इस्रायलचा निषेध करून सभात्याग केला. पण भारताने इस्रायलविरोधात निषेध केला नाही. भारत समर्थकात बसून राहिला. इतकंच नव्हे तर आपल्या डिफेन्स इंडस्ट्रीत अतिशय भीषण बॉम्ब तयार केले जातात, ते आपण इस्रायलला निर्यात करत आहोत. तिकडे त्याचा वापर पॅलेस्टाईनच्या विरोधात होतो. भाजप इस्रायलला दुखवू इच्छित नाही. त्याला दुखविणे भाजपसाठी शक्य नाही. कारण पेगॅसस असो किंवा

पॅलेस्टाईनमधील नरसंहार त्यावर भाजपची भूमिका इस्रायलला संरक्षण देणारी आहे. त्यामुळे इस्रायल आता मोदी सरकारचा सर्वांत मोठा प्रोटेक्टर झाला आहे. तो फक्त संरक्षक नाही तर हस्तक्षेप करणारा प्रोटेक्टर आहे. तो नुसता हस्तक्षेप करणारा प्रोटेक्टर नाही तर निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करून, त्यांचा डेटा इथं वापरून निवडणुकांवर नियंत्रण ठेवणारा आहे.

२०२४च्या निवडणुकीत मोदींना 'चार सौ पार' जागा हव्या होत्या, पण त्या त्यांना मिळाल्या नाहीत. परंतु साधी प्रथा आहे की, निवडणुकांचे निकाल हाती येताच संसदीय मंडळ एक मीटिंग घेते. मग ते विधानसभा असो किंवा लोकसभा! काँग्रेस पार्लमेंटरी पार्टी, भाजप पार्लमेंटरी पार्टी, कम्युनिस्ट पार्लमेंटरी पार्टी आपल्या पक्षाचा नेता ठरविते. तो नेता पार्लमेंटमध्ये त्या पक्षाचं प्रतिनिधित्व करतो. परंतु २०२४च्या निवडणुकीनंतर भाजपची अशी पार्लमेंटरी पार्टी मीटिंग झालीच नाही. तर एनडीएची झाली. त्यात तर अनेक पक्ष सहभागी आहेत. ही मिटिंग परंपरेला सोडून होती. प्रत्यक्षात भाजप पार्लमेंटरी पार्टी मीटिंग व्हावी आणि तिने मोदींची पंतप्रधान म्हणून निवड करावी. घटक पक्षातील इतर सर्व पक्षांचे लोक आपापले प्रतिनिधी निवडून देतात, त्यांची बैठक होते, ते ठरवतात की, आमचा सर्वांचा प्रतिनिधी मोदी आहे. पण तसं झालेलंच नाही. भाजपची पार्लमेंटरी पार्टीची मिटिंगच झाली नाही. एनडीएची झाली असं त्यांनी दाखवलं आणि थेट राष्ट्रपतींनी मोदींना शपथविधीला पाचारण केलं. कारण त्यांना भरवसा नव्हता की, एनडीएत सामील झालेले दोन नवीन खेळाडू – चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार आपल्याला पाठिंबा देतील. त्यामुळे ताबडतोब एनडीएची म्हणजेच पार्लमेंट मीटिंग करून ते पंतप्रधान झाले. या सर्व छोट्या-मोठ्या स्ट्रॅटेजी असतात. त्या मतांच्या आकड्यांवर ठरतात, त्या कोण निवडून येतील यावर ठरतात आणि हे सर्व ठरविण्यासाठी डेटाबेस लागतो.

सध्या भारतात निवडणूक आयोगात याच डेटाबेसची चर्चा सुरू आहे. आयोगाने निर्लज्जपणे सांगून टाकलं की, आम्ही त्या व्हिज्वल टेप्स (डाटा) जाळून टाकल्या. आता तो डेटा उपलब्ध नाही. हे कसं होऊ शकतं? कोणतीही गोष्ट आपसूक घडत नाहीत. त्या टेप्स आपोआप जळत नाहीत. त्यांना कोणीतरी हे जाळून टाका, असा निर्देश करावा लागतो. तो निर्देश देणारा कोणी आपलाच मंत्री असेल. तो आपला मंत्री कोणाच्या हिशेबावरती करणार? कोणीतरी डेटा उपलब्ध करणार, आता तो डेटा कोण उपलबध करून देऊ शकतो? केवळ आरएसएस, नाही केवळ भारतीय नाही, आरएसएस मोसादचे एजंट झाले. तर मोदी सरकार, इस्रायली गव्हर्मेंट आणि इस्रायली डिफेन्स सेक्टरचे एजंट झाले. त्याचप्रमाणे इस्रायली डिफेन्स सेक्टर आणि अमेरिकन डिफेन्स सेक्टर हे युतीमध्ये आहेत. म्हणजे मोदी भारतीय मतदारांनी निवडून दिलेले पंतप्रधान नाहीत, तर मोदींना इंटरनॅशनल एमआयसी आणि जागतिक वित्तीय शक्तींनी पंतप्रधान म्हणून बसवलं आहे.

वित्तीय शक्ती या प्रचंड महत्त्वाच्या असतात. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत. त्या बाजूला ठेवल्या तर येणाऱ्या बातम्यांचा दुसरा थर पहा. तो दुसरा थर रिझर्व बँकचा रेपो रेट काय म्हणतोय? रिझर्व बँक गव्हर्नर काय म्हणतोय? कोणत्या बँका ताब्यात घ्यायच्या? कोणत्या बँका विकायला काढायच्या? कोणत्या बँकांचं विलीनीकरण करायचं? कोणत्या बँका विकून टाकायच्या? अशा आहेत.

वास्तविक, परदेशी बँकांना भारतात आणण्यासाठी हे सर्व चालू आहे. हे एक आंतरराष्ट्रीय फायनान्शियल सर्किट आहे. पहिलं सर्किट, एमआयसी तर दुसरं सर्किट वित्तीय आहे. यावर नियंत्रण करण्यासाठी लागणारा सर्व डेटा कोण पुरवतो? हे आपल्या कक्षेत नाही. भारत सरकारकडे ज्या एजन्सीज आहेत, त्यांच्याकडे एवढा प्रचंड मॉन्युमेंटल, जगद्व्याळ डेटा तयार करून तो विश्लेषित करण्याची टेक्नॉलॉजिकल ताकद नाहीये. भारतात हुशार लोक आहेत. सिलिकॉन व्हॅली आणि

मायक्रोसॉफ्टमध्ये आपलेच लोक आहेत. पण त्यासाठी टेक्नॉलॉजिकल सॉफ्टवेअर नाही. हे टेक्नॉलॉजिकल सॉफ्टवेअर आता अमेरिकेपेक्षा जास्त इस्रायलमध्ये आहे. त्यामुळे *इस्रायल इज ट्राईंग टू रन नॉट जस्ट गव्हर्मेंट, इट इज ट्राईंग टू रन होल सोसायटी.*

त्यामुळे भारतात सर्व भागात सामाजिक अस्वस्थता दिसायला लागली आहे. जे २००२ आणि २००४पर्यंत दिसत नव्हते. महाराष्ट्रात मराठे मोर्चे काढत आहेत, त्यांच्याविरुद्ध ओबीसी मोर्चे काढत आहेत. त्या ओबीसींविरुद्ध दुसरे जातिसमूह मोर्चे काढत आहेत. हे आतापर्यंत नव्हतं. राजकीय पक्षापुरता, त्यांच्या नेत्यांपुरता विचार व्हायचा. पण आता समाजात जाती, अस्मितेच्या नावाने विभाजित असलेल्या संस्था एकदम उफाळून आलेल्या दिसतात. यातील कोणतीही गोष्ट आपसूक घडत नाही. यातील कोणत्याही पक्षाचा कोणताही नेता हा स्वतःच्या प्रेरणेने बोलत नाही. त्यांचे बोलविते धनी कोणीतरी वेगळे आहेत, ते आंतरराष्ट्रीय आहेत. म्हणून मोदी इज नॉट इंडिया नॉमिनेटेड, इलेक्ट्रेड प्राईम मिनिस्टर; मोदी इज इमप्लांटेड देअर बाय इंटरनॅशनल एजन्सीज. त्यामुळे आमचा संघर्ष खूप कठीण आहे. इंदिरा गांधींच्या काळात परकीय हस्तक्षेप म्हटलं जायचं, त्यावेळी टिंगल व्हायची. तो प्रकार वेगळा होता. तो काळ अलग होता. त्यामुळे आता त्या काळाची तुलना करायची गरज नाही. पण या घडीला मात्र, मोदी डज नॉट रिप्रेझेंट यू अँड मी, ही रिप्रेझेंट्स् अमेरिकन अँड इस्रायली वेस्टर्न इंटरेस्ट!

(२६ नोव्हेबर २०२५ रोजी मुंबईत काँग्रेस भवन येथे संविधान दिनानिमित्त केलेल्या भाषणाचे शब्दांकन.)

परिवर्तनाचा वाटसरू

वर्गणीचे दर : व्यक्तींसाठी वार्षिक : ८०० रु., त्रैवार्षिक : २,१०० रु., दशवार्षिक : ६,५०० रु.

डिजिटल कॉपीसाठी वार्षिक ३०० रु., डिजिटल + छापील १००० रु.

महाविद्यालये व संस्थांसाठीची वार्षिक वर्गणी : १००० रु.

(पुढील प्रत्येक वर्षासाठी १०००च्या पटीत)

'परिवर्तनाचा वाटसरू'ची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील

आय.डी.बी.आय. बँक, ठाणे – जांभळी नाका, चालू खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**

बचत खाते क्र. : 0495102000023296 आयएफएससी क्र. : IBKL0000495